प्रबोधन
गोरेगाव

# एकविसावा वार्षिक अहवाल

## १९९३ - ९४

# प्रबोधन गोरेगाव

## प्रबोधन क्रीडाभवन

सिद्धार्थ नगर, गोरेगाव (प.), मुंबई ४०० १०४

### २१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

'प्रबोधन गोरेगाव' या संस्थेची २१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक २१ नोव्हेंबर १९९४ रोजी रात्री ९.०० वाजता, प्रबोधन क्रीडाभवन, सिद्धार्थ नगर, गोरेगाव (प.), मुंबई ४०० १०४ येथे आयोजित करण्यात आली आहे. या सभेस सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

**सभेपुढील कामकाज**

१. प्रास्ताविक

२. सन १९९२-९३ सालच्या वार्षिक सभेचे इतिवृत्त वाचन व त्यास मंजूरी देणे.

३. १९९३-९४ चा वार्षिक अहवाल, आयव्यय पत्रक व ताळेबंद (हिशेब तपासनीसांच्या अहवालासह) वाचून मंजूर करणे.

४. नवीन वर्षाकरिता (१९९४-९५) घटनेच्या कलम ७ इ प्रमाणे अध्यक्ष (१ जागा) उपाध्यक्ष (२ जागा) व कार्यकारी मंडळावरील निवृत्त झालेल्या ३ सभासदांच्या जागी नवीन सभासदांची निवड करणे. (एकूण ६ जागा)

५. नवीन वर्षाकरिता अंतर्गत हिशेब तपासनीस व सरकारमान्य हिशेब तपासनीस यांची नेमणूक करणे.

६. अध्यक्षांच्या अनुमतीने सभेपुढे येणारी कामे.

कार्यकारी मंडळाच्या आज्ञेवरून

**गिरीश देसाई**

कार्याध्यक्ष

**डॉ. मनोहर अदवानकर**

प्रमुख कार्यवाह

दि. २५ ऑक्टोबर १९९४

गोरेगाव, मुंबई - १०४

---

१) संस्थेचा जमाखर्च सभासदांच्या अवलोकनार्थ प्रबोधन क्रीडाभवन, सिद्धार्थनगर, गोरेगाव (प.), मुंबई ४०० १०४, येथील संस्थेच्या कार्यालयात दि. ११-११-९४ ते १५-११-९४ पर्यंत रोज संध्याकाळी ६ ते ७ पर्यंत ठेवण्यात येईल.

२) कोणाही सभासदास त्या बाबतीत काही सूचना करावयाच्या असल्यास त्या दिनांक १३-११-९४ पूर्वी कार्याध्यक्षांकडे लेखी सादर कराव्यात.

३) गणसंख्येच्या अभावी वरील सभा तहकूब झाल्यास, तहकूब झालेली सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल व अशा सभेस गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही.

४) निवडणुकीस उभे राहू इच्छिणाऱ्या सभासदांनी आपले अर्ज दि. १६-११-९४ पूर्वी संस्था कार्यालयात संध्या. ६ ते ७ या वेळेत आणून द्यावेत. अर्जाचा नमूना याच ठिकाणी उपलब्ध आहे.

# प्रबोधन, गोरेगाव

२१वा वार्षिक अहवाल

१९९३ - १९९४

**'प्रबोधन-गोरेगाव'** या संस्थेच्या दि. १ एप्रिल, १९९३ ते ३१ मार्च १९९४ या •कालावधीतील कार्याचा अहवाल व हिशेब पत्रके संस्थेच्या सर्व सन्माननीय सभासदांना सादर करताना संस्थेच्या कार्यकारी मंडळास अत्यानंद होत आहे.

या अहवाल वर्षात संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या एकूण ९ सभा घेण्यात आल्या व स्वीकृत सभासदांसह कार्यकारी मंडळाच्या सभासदांची संख्या १४ एवढी होती.

## प्रोजेक्ट - २०००' : एक महत्वाकांक्षी प्रकल्प :-

ऑलिम्पिकमधून भारतीय खेळाडूंना नेहमी पदकाविना परतावे लागते. हा दोष भारतीय खेळाडूंचा नव्हे. भारतीय खेळाडू जागतिक दर्जाच्या कसोटीस उतरणारे आहेत; त्याप्रमाणे ते जिद्दी व मेहनती सुद्धा आहेत, फक्त उणीव आहे ती योग्य मार्गदर्शनाची व पद्धतशीर मेहनतीची, त्याचप्रमाणे आपण आपल्या देशासाठी केलेल्या मेहनतीचे चिज झाले, ही जाणीव खेळाडूंच्या मनात निर्माण होण्याची. उमेदीचा काळ संपल्यावर आपणास काही भविष्यकाळ असणार नाही याची चिंता खेळाडूंना नेहमीच सलत असते. त्यामुळेच फक्त खेळावर लक्ष केंद्रित करणारे खेळाडू हिंदुस्थानात नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. इ.स. २००० साली होणाऱ्या जागतिक ऑलिम्पिकमध्ये हिंदुस्थानला निदान् एकतरी पदक मिळवून देणारा खेळाडू निर्माण करण्याची उमेद बाळगून 'प्रबोधन' ने गोरेगावचे माजी आमदार श्री. सुभाष देसाई यांच्या कुशल, कल्पक व धाडसी नेतृत्वाखाली 'प्रोजेक्ट २०००' या महत्वाकांक्षी प्रकल्पाची आखणी केली. हा महत्वाकांक्षी प्रकल्प राबविण्या- साठी व कार्यान्वित करण्यासाठी गेल्या अहवाल वर्षात श्री. यशवंतराव गोळे, सेक्रेटरी- जनरल, महाराष्ट्र राज्य ऑलिम्पिक असोसिएशन, यांच्या अध्यक्षतेखाली एक समिति नेमण्यात आली होती. या प्रकल्पासाठी दि. १८ ते २० डिसेंबर १९९२, दरम्यान झालेल्या १५ व्या प्रबोधन क्रीडामहो- त्सवातून ज्या खेळाडूंची निवड करण्यात आली होती, त्यांना अंतिम निवडीसाठी दि. १५ एप्रिल १९९३ रोजी प्रबोधन क्रीडाभवनावर बोलावण्यात आले. 'प्रोजेक्ट २०००' समितीच्या सभासदा- च्या देखरेखीखाली या प्रकल्पासाठी निवड झालेल्या मुलामुलींची अंतिम चाचणी घेण्यात आली. त्याप्रसंगी 'प्रोजेक्ट २०००' समितीचे सर्व मान्यवर सदस्य, प्रबोधन कार्यकारिणीचे मान्यवर सदस्य, त्याचप्रमाणे 'प्रोजेक्ट २०००' चे क्रीडा- प्रशिक्षक श्री. बालागोविंद हे उपस्थित होते. या चाचणीतून १५ मुले व १५ मुली यांची अंतिम निवड करण्यात आली.

दि. २८ एप्रिल १९९३ रोजी बॉम्बे हॉकी असोसिएशन च्या चर्चगेट येथील कार्यालयात पत्रकार परिषदेचे आयोजन करून 'प्रोजेक्ट २०००' या प्रकल्पासंबंधीची माहिती सर्व पत्रकारांना देण्यात आली. सर्व क्रीडा पत्रकारांनी या योजनेचे मनःपूर्वक स्वागत करून या योजनेला योग्य ती प्रसिद्धी दिली.

श्री.आनंदराव अडसूळ हे उपस्थित होते.

## 'नागरी पुरस्कार' प्रबोधनला प्रदान :-

शैक्षणिक त्याचप्रमाणे सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मुंबईमधील संस्थांना 'बॉम्बे चेम्बर ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रीज' तर्फे दरवर्षी 'नागरी पुरस्कार' प्रदान करण्यात येतो. १९९२-९३ या सालाकरता, या पुरस्कारसाठी 'बॉम्बे चेम्बर ऑफ कॉमर्स ॲन्ड् इंडस्ट्रीज' ने 'प्रबोधन-गोरेगाव' ची निवड करून संस्थेच्या शिरपेचात आणखी एक तुरा खोवला आहे. हा पुरस्कार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. शरद पवार यांच्या शुभहस्ते श्री. सुभाष देसाई यांनी, दि. ३जून १९९३ रोजी ताजमहल हॉटेलात झालेल्या दिमाखदार सोहळ्यात स्वीकारला. त्याप्रसंगी चेम्बरचे अध्यक्ष श्री. शेखर दत्ता, महाराष्ट्राचे उद्योगमंत्री श्री. जवाहरलालजी दर्डा, बॉम्बे चेम्बर ऑफ कॉमर्स ॲन्ड् इंडस्ट्रीजचे नवनिर्वाचित् अध्यक्ष श्री. अतुल चोकसी, महाराष्ट्राचे उद्योग राज्यमंत्री श्री. अविनाश नाईक हे उपस्थित होते.

बॉम्बे चेम्बर ऑफ कॉमर्स ॲन्ड् इंडस्टीज् ने नागरी पुरस्कारासाठी प्रबोधन गोरेगावची निवड करून संस्थेच्या आजवरच्या शैक्षणिक, सामाजिक त्याचप्रमाणे क्रीडाक्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीचा गौरव केला आहे, असे आम्हास वाटते. 'चेम्बर' तर्फे दरवर्षी देण्यात येणारा हा पुरस्कार अत्यंत मानाचा समजला जातो.

## क्रिकेट उन्हाळी प्रशिक्षण वर्ग:-

दि. १५ एप्रिल ते ३१ मे १९९३ या कालावधीत मुलांसाठी क्रिकेटचे उन्हाळी प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षण वर्गातील मुलांना प्रमाणपत्रे वितरण करण्याचा सोहळा दि. ५ जून १९९३ रोजी क्रीडामहर्षि श्री. यशवंतराव गोळे यांच्याहस्ते पार पडला. एकूण १५० मुलांनी या उन्हाळी प्रशिक्षणाचा लाभ घेतला.

बॉम्बे क्रिकेट असोसिएशन (बी.सी.ए.) तर्फे मुंबई शहर व उपनगरात क्रिकेटची उन्हाळी प्रशिक्षण केंद्रे नामवंत क्रिकेट तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात येतात. प्रबोधनने गोरेगावात क्रिकेटची हिरवळीची खेळपट्टी तयार केल्यामुळे यावर्षी बीसीए आयोजित क्रिकेट प्रशिक्षण केंद्र गोरेगावतही सुरू करण्यात आले. दिनांक १५ एप्रिल ते ३१ मे ९३ दरम्यान हे केंद्र कार्यान्वित होते.

## प्रबोधनचे 'प्रोजेक्ट २०००' 'झी' टीव्हीवर :-

'प्रोजेक्ट २०००' च्या संकल्पनेने भारावून जाऊन 'झी' टीव्हीवर 'कोई जीता कोई हारा'या मालिकेचे संयोजक रविवार दि. २२ ऑगस्ट १९९३ रोजी क्रीडाभवनात चित्रीकरणासाठी आले होते. त्यादिवशी दिवसभर त्यांनी प्रबोधन क्रीडाभवनात चालविण्यात येणाऱ्या अनेकविध उपक्रमांचे व प्रामुख्याने 'प्रोजेक्ट २०००' च्या मुलामुलींचे प्रशिक्षण सुरू असतानाचे चित्रीकरण केले. सदरचे चित्रीकरण 'कोई जीता - कोई हारा' या कार्यक्रमात अत्यंत सुत्रबद्धरितीने दाखविण्यात आले. अशातऱ्हेने 'प्रोजेक्ट २०००' या कार्यक्रमास देशभर प्रसिद्धी मिळाली. या कार्यक्रमामुळे देशातील अनेक क्रीडा-केंद्रामध्ये गोरेगावचा समावेश झाला आहे ही गोरेगावकरांसाठी अभिमानाची घटना आहे असे म्हणणे उचित ठरेल.

**प्रोजेक्ट २०००' च्या मदतीसाठी 'मारुती' जिंका हा कार्यक्रम : -**

'प्रोजेक्ट २०००' हा उपक्रम अत्यंत खर्चिक आहे. तीस मुलामुलींना ७ वर्षे सातत्याने खेळांचे शास्त्रशुद्ध शिक्षण देणे, यासाठी एकूण ४२ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. एवढा खर्च करणे हे संस्थेच्या आवाक्याबाहेरचे काम आहे. संस्थेने अनेक मान्यवर व्यक्तिंना, निरनिराळ्या उद्योग समुहांना या प्रकल्पासाठी अर्थसहाय्य करण्याची आग्रहाची व कळकळीची विनंती केली होती. त्या विनंतीस काही प्रमाणात प्रतिसाद मिळाला. ऑटोराइडर्सचे श्री. मुकेशभाई पटेल यांच्या सहकार्याने या प्रकल्पासाठी 'मारुती कार जिंका' ही योजना प्रबोधनने आखली.

या उपक्रमास अनेक मान्यवरांचा सहभाग लाभला. परंतु ही योजना कार्यान्वित झाल्यानंतर दि. ३० सप्टेंबर १९९३ रोजी भुकंपासारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे ही योजना पुढे राबविणे अशक्य झाले. ही योजना थांबविण्यात आली व ज्यांनी या योजनेसाठी मदत केली होती त्यांची नावे त्यानंतर काढण्यात आलेल्या स्मरणिकेत जाहिरातीच्या स्वरूपात प्रसिद्ध करण्याचे ठरले.

प्रबोधनच्या 'प्रोजेक्ट २०००' या योजनेची माननीय श्री. शरद पवार, मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांनी खूपच प्रशंसा केली व त्यांनी मुख्यमंत्री सहाय्य निधी मधून रुपये पाच लाखाचे अनुदान दिले.

**प्रबोधन वक्तृत्व स्पर्धा : वर्ष २१ वे :-**

दुसऱ्यावर प्रभाव पाडण्यासाठी वक्तृत्वगुण अंगी असणे अत्यावश्यक आहे. धारदार व शैलीदार वक्तृत्वाने व्याख्याता श्रोत्यांना मंत्रमुग्ध करू शकतो. तीच वक्तृत्वकला चारचौघात इतरांवर छाप पाडण्यासाठी सुद्धा अत्यंत उपयुक्त अशीच आहे. या कलेची हल्लीच्या जाहिरातीच्या युगात नितांत आवश्यकता आहे. परंतु स्टार टीव्ही व झी टीव्ही सारख्या माध्यमांच्या आक्रमणामुळे अशी कला जोपासणे आजकाल फारच कठिण झाले आहे. शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या अंगच्या सुप्त वक्तृत्व गुणांना उत्तेजन देण्याच्या उद्देश्याने संस्थेने आपल्या स्थापनेपासूनच सुरू केलेली ही स्पर्धा यंदाच्या २१ व्या वर्षी सातत्याने घेण्यात आली. यंदाच्या स्पर्धा दि. १२ सप्टेंबर १९९३ रोजी पाटकर महाविद्यालयात, विद्यार्थी, शिक्षक व पालक यांच्या उपस्थितीत अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडल्या. या स्पर्धेला मुंबई व मुंबई बाहेरील शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा सहभाग लाभला होता, तरीसुद्धा या स्पर्धेस मिळणारा प्रतिसाद हा दरवर्षी कमी होत आहे, ही या स्पर्धेच्या आयोजनाच्या दृष्टीने अत्यंत चिंतेची बाब आहे; असे आम्हांस खेदाने नमूद करावेसे वाटते. दरवर्षी मुंबई बाहेरून येणाऱ्या स्पर्धकांची निवास व भोजनाची सोय संस्थेतर्फे विनामूल्य करण्यात येते.

या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ त्याच दिवशी संस्थेचे अध्यक्ष श्री.भाई सावंत यांच्या शुभ हस्ते पार पडला. शालेय गटाचे परीक्षण सौ. अ.अ. काळे व सौ. दारशेतकर यांनी, तर महाविद्यालयीन गटाचे परीक्षण सौ. मीना गोखले व सौ. शुभदा शेळके यांनी केले. स्पर्धेचा निकाल पुढील प्रमाणे:

विविध स्पर्धांत भाग घेऊन आपले नैपुण्य प्रकट केले.

दि. २७ ते २९ नोव्हेंबर १९९३ या कालावधीत हेमंत युथ कल्चरल ग्रुप (पार्ले) यांनी आयोजित केलेल्या स्पर्धेत पुरुष संघाने उपविजेतेपद पटकाविले. याच स्पर्धेत नरेंद्र रावतोळे याने उत्कृष्ट खेळाडूंचा बहुमान पटकाविला. प्रबोधनचा खो-खो पटू कुमार शैलेश र. गुरव यांची २५ ते २८ ऑक्टोबर १९९३ या कालावधीत सतना, मध्यप्रदेश येथे झालेल्या राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्य शालेय संघात निवड झाली, त्याचप्रमाणे ११ ते १६ फेब्रुवारी १९९४ या कालावधीत धुळे येथे घेण्यात आलेल्या १६ व्या ज्युनियर राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड करण्यात आली. या स्पर्धेत खेळतांना, कुमार शैलेश गुरवची सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून निवड करण्यात आली. व त्याला अखिल भारतीय खो-खो फेडरेशन तर्फे सर्वोत्कृष्ट खेळाडूसाठी असणारा 'वीर अभिमन्यू' पुरस्कार देण्यात आला.

तुषार मोरे व भरत पवार या प्रबोधनच्या दुसऱ्या दोन खो-खो पटूंची, दि. १० ते १४ फेब्रुवारी १९९४ या कालावधीत बंगलोर येथे झालेल्या ज्युनियर शालेय राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्य शालेय संघात निवड झाली होती. तर मुलींच्या संघातील पल्लवी वेंगुर्लेकर हिची दि. ११ ते १६ फेबुवारी १९९४ या कालावधीत धुळे येथे झालेल्या १६व्या राष्ट्रीय ज्युनियर स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड करण्यात आली. कु. वैशाली नाडकर्णी हिची दि. १ ते ९ फेबुवारी १९९४ या कालावधित कोपरगाव येथे झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ अजिंक्यपद स्पर्धेसाठी निवड झाली. तसेच जानेवारी १९९४ या कालावधीत बंगलोर व कलकत्ता येथे पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ अजिंक्यपद स्पर्धेसाठी मुंबई विद्यापीठ संघात निवड करण्यात आली.

दि. २३ ते २६ या कालावधीत सांगली येथे आयोजित करण्यात आलेल्या राज्य अजिंक्यपद, ज्युनियर, या स्पर्धेसाठी मुंबई उपनगर संघात प्रबोधनच्या खो-खो संघातील खालील खेळाडूंची निवड करण्यात आली.
मुले : शैलेश गुरव, निशिकांत जाधव, धनेश संख्ये, मिलिंद दिघे.
मुली : हर्षा सडेकर, पल्लवी वेंगुर्लेकर, मनिषा जाधव.

## संस्था व खेळाडूंचे आशास्थान प्रबोधन क्रीडाभवन व क्रीडांगण:-

'प्रबोधन' चे समतल असलेले क्रीडांगण व सर्व सोयींनी सुसज्ज असे क्रीडाभवन याचा फायदा अनेक शाळांनी, संस्थांनी घेतला व प्रबोधन क्रीडाभवन व क्रीडांगण, क्रीडाप्रेमी संस्थांचे, खेळाडूंचे व संघटनांचे आशास्थान झाले असल्याचे शिक्कामोर्तब केले.

या क्रीडांगणावर मुंबई पोलिस विभागीय दलाच्या कवायती दर शुक्रवारी होतात. मुंबई महानगर पालिकेच्या शाळांचे क्रीडा सामने व पी/दक्षिण वार्डाचे क्रिकेटच्या सरावाचे सामने याठिकाणी आयोजित करण्यात आले होते. संचालक क्रीडा व युवक सेवा (महाराष्ट्र राज्य) यांच्या क्रीडासंबंधीच्या चाचण्या त्याचप्रमाणे जिल्हा क्रीडाधिकारी उपनगरे यांच्यातर्फे आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धा, चाचणी स्पर्धा व निवड स्पर्धा याठिकाणी घेण्यात आल्या. महाराष्ट्र राज्य कामगार कल्याण मंडळाच्या क्रीडा स्पर्धाही या क्रीडांगणावर आयोजित

करण्यात आल्या. पहिली आंतर बँक व्हॉलिबॉल स्पर्धा (पश्चिम विभाग) व विविध बँकांच्या कर्मचाऱ्यांच्या मुलामुलींचे खो-खो व कबड्डी सराव शिबिराचे मे-१९९३ मध्यें आयोजन करण्यात आले होते.

पॉलिकेम् रिक्रिएशन् क्लब, गोरेगाव मेडिकल असोसिएशन, इंटरनॅशनल एअरपोर्ट ॲथोरिटी ऑफ इंडिया रिक्रिएशन क्लब, ओनिडा, मालाड मेडिकल असोसिएशन त्याचप्रमाणे पश्चिम उपनगरांतील अनेक विद्यालयांनी व महाविद्यालयांनी या क्रीडांगणाच्या व क्रीडाभवनांतील विविध सोयींचा लाभ घेतला.

**कबड्डी :-**

प्रबोधनच्या मुलामुलींच्या कबड्डी संघाने मुंबई उपनगरात निरनिराळ्या संस्थांनी आयोजित केलेल्या सामन्यात सहभागी होऊन प्रबोधनला अहवाल वर्षात चार करंडक मिळवून दिले आहेत. कबड्डी प्रशिक्षक श्री. येरूणकरांच्या मार्गदर्शनाखाली या दोन्ही संघांनी मनापासून सराव चालू ठेवला आहे.

**मल्लखांब व जिम्नॅस्टिक :-**

गोरेगावांतील वय वर्ष ५ ते १२ वयोगटातील ८० मुले व मुली मल्लखांब व जिम्नॅटिकचे प्रशिक्षण कु. शशी नवले व श्री. दत्ता दुधम यांच्या मार्गदर्शनाखाली घेत आहेत. या बाल क्रीडा पटूंनीसुद्धा मुंबईत आयोजिलेल्या अनेक स्पर्धांमध्ये भाग घेतला.

**कराटे :-**

श्री. संतोष साळकर यांच्या मार्गदर्शनाखाली कराटेचे प्रशिक्षण व प्रबोधन कराटे संघाचा सराव नित्याने क्रीडाभवनात सुरू आहे. प्रबोधन कराटे संघाने अहवाल वर्षात जपान कराटे असोसिएशन तर्फे घेण्यात आलेल्या पश्चिम उपनगरातील प्रशिक्षण केंद्राच्या स्पर्धेत धवल यश संपादन केले. प्रबोधन च्या संघाने ६ सुवर्ण पदके व ८ रौप्य पदके मिळविली.

**क्रिकेट :-**

अहवालवर्षात प्रबोधनच्या क्रिकेट संघांनी प्रथमच कल्पेश कोळी व गोवर्धनदास क्रिकेट स्पर्धेत भाग घेतला.

## प्रबोधन अभ्यासिका वर्ग-

६ ऑक्टो. १९९२ रोजी सिद्धार्थनगर येथील महानगर पालिकेच्या शाळेत ''प्रबोधन अभ्यासिका'' वर्गाचे उद्घाटन जोतिर्भास्कर श्री. जयंतराव साळगांवकर, श्रीसिद्धी-विनायक गणपती मंदिर न्यासाचे विश्वस्त यांच्या शुभहस्ते झाले. डिसेंबर १९९३ पासून या शैक्षणिक कार्यास न्यासाच्या वतीने अर्थसहाय्य लाभत आहे.

''प्रबोधन अभ्यासिके''त अभ्यासिका कार्यकारी संचालक श्री. मुकुंद चव्हाण, शिक्षक व विद्यार्थी प्रतिनिधी यांचे 'संचालक मंडळ' गठीत करण्यात आले आहे. अभ्यासिकेत प्रवेश देताना विद्यार्थी व पालक यांची गरज लक्षात घेण्यात येते. प्रवेश देतेवेळी केवळ गुणवत्ता हाच निकष न लावता गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना प्राधान्य दिले जाते. या विद्यार्थ्यांना अभ्यासिकेच्या शिक्षकांकडून मार्गदर्शन केले जाते. नव्यानेच सुरू झालेल्या

# प्रबोधन गोरेगाव

*कार्यालय :* प्रबोधन क्रीडाभवन, सिद्धार्थ नगर, गोरेगाव (प.), मुंबई ४०० १०४
दूरध्वनी : ८७३ ४८ ६९

संस्था नोंदणी कायदा १८६० अन्वये नोंदलेली संस्था [Regn. No. Bom. 46/72 GB BSD] मुंबई
सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदलेली संस्था [Regn No. F 2502 Bom.]

१९९३ - ९४

अध्यक्ष : **श्री. विलास देवरूखकर** बी.एस्सी.
उपाध्यक्ष : **श्री. वसंत तावडे** बी.ए.
**श्री. पद्माकर देसाई** बी. एस्सी. (ऑ.)

कार्यकारी मंडळ

कार्याध्यक्ष : **श्री. गिरीश देसाई** डी.सी.ई.
प्रमुख कार्यवाह : **डॉ. मनोहर अदवानकर** एम्.एस्सी. पीएच्.डी.
सहकार्यावह : **श्री. श्रीनिवास शिरसेकर** जी.डी. आर्ट
: **श्री. नितीन शिंदे**
खजिनदार : **श्री. महादेव खानोलकर**

सभासद

**श्री. दिनकर मालवणकर**
**श्री. चंद्रकांत पोतदार**
**श्री. मिलींद ढुंबरे** बी.कॉम्.
**श्री. समीर त्रैलोक्य** बी.एस्सी.
**श्री. भूषण काळे**
**ॲड्. विकास रेळे** बी.ए.,एल्एल.बी.
**श्री. चंद्रकांत देऊलकर**
**श्री. पांडुरंग पोखरकर** बी.एस्सी.
**श्री. सुरेश चव्हाण** बी.ए.
**श्री. सुधीर मिठबावकर** बी.एस्सी.,बी.एड्.

अंतर्गत हिशेब तपासनीस
**श्री. रविराज नाखरे** बी.कॉम्.

सनदी लेखापाल
मे. एस्. एस्. नायक आणि कं.